**नियमित दिवाणी दावा क्र.१०४/२०१९**
**शिवाजी व इतर वि. पांडुरंग भोसले व इतर**
**CNR No.- MHNS230018022019**

## आदेश निशाणी क्र.०५

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ दिवाणी प्रक्रिया संहिता अंतर्गत प्रतिवादी क्र.०१ ते ०३ विरुध्द तात्पुरता मनाई हुकूमाच्या आदेशाकरीता केलेला आहे.

**०२** वादी/अर्जदार यांचे थोडक्यात कथन याप्रमाणे आहे की, दाव्यातील परिच्छेद क्र.०१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वादातील मिळकती मौजे धामणी येथील गट क्र.३५९, ३६४, ४७, ६, ७६, १२५, ३०९/१, ५२, १९१, २९५, ३०९/२ तसेच मौजे पिंपळगावमोर येथील गट क्र.१७४ क्षेत्र ०.५९.८० हे. आर + पोटखराब ०.०२.४० हे. आर ह्या मुळ पुरुष कै. लक्ष्मण भोसले यांच्या मालकीच्या होत्या. त्यांच्या निधनानंतर त्यांचे वारस म्हणुन मुलगा नारायण लक्ष्मण भोसले यांचे नाव मिळकतींचे मालक म्हणुन लावण्यात आले. नारायण यांच्या मृत्युनंतर त्यांचा वारस त्यांचा मुलगा रघुनाथ नारायण भोसले यांचे नाव लावण्यात आले. रघुनाथ भोसले यांना सिताबाई व देउबाई अशा दोन पत्नी होत्या. वादी क्र.०१, ०२ व प्रतिवादी क्र.०४ हे सिताबाई यांचे वारस आहेत. प्रतिवादी क्र.०१ ते ०३, ०५ व ०६ हे देउबाई यांची अपत्ये आहेत. रघुनाथ नारायण भोसले हे दिनांक ०७/०१/२००० रोजी मयत झाले. त्यामुळे वादी व प्रतिवादी हे त्यांचे वारस असून दाव्यातील मिळकती ह्या त्यांच्या एकत्र कुटुंबाच्या मालकीच्या मिळकती आहेत. त्यामुळे त्यांचे दावा मिळकतीमध्ये अविभाज्य हिस्सा आहे. वादी व प्रतिवादींमध्ये सरसनिरस मानाने वाटणीपत्र झालेले नाही व त्याप्रमाणे ते कब्जेवहीवाटीत नाही. वादी व प्रतिवादी यांचे वाद नको म्हणुन रघुनाथ भोसले यांनी प्रतिवादी अज्ञान असतांना काही मिळकती प्रतिवादी क्र.०१ व वादी क्र.०१ यांच्या नावावर तात्पुरत्या केल्या होत्या. त्यांच्यात वाद

नको म्हणुन वडिलोपार्जीत घरामध्ये वेगळे राहून सोईनुसार मिळकतीमध्ये वहिती करुन उत्पन्न घेत होते. महसूल अभिलेखावर प्रतिवादी क्र.०१ यांच्या नावाचा गैरफायदा घेउन त्यांनी गट क्र.३०९ पैकी ४० आर जनाबाई भोसले व ४० आर तान्हाजी भोर यांना विक्री केली. प्रतिवादी क्र.०२ व ०३ यांनी त्या मिळकतीपैकी बबन ढेमसे यांना ३ एकर क्षेत्र विक्री केले. गट क्र.३५९ पैकी काही क्षेत्र समृध्दी महामार्गासाठी रस्ते विकास महामंडळाने विकत घेतले. प्रतिवादी क्र.०१ यांना अधिकार नसतांना त्यांनी मुलगा किरण पांडुरंग भोसले याच्या नावावर खरेदी करुन दिले. वादीचे राहते घर सदर रस्त्यात गेले असल्याने त्यांच्या ताब्यात असलेल्या मिळकतीमध्ये जागा लेव्हल करण्यासाठी दिनांक १०/१२/२०१८ रोजी जे.सी.बी लावले असता प्रतिवादींनी वादींना शिवीगाळ करुन धमकी दिली व घर बांधणीस अडथळा केला. प्रतिवादी क्र.०२ व ०३ हे सुध्दा सदर क्षेत्रात घर बांधकाम करीत आहेत. वादी हे त्यांचे सावत्र भाउ असल्यामुळे त्यांच्या हक्कापासून वंचित करण्याकरीता वादींना त्रास देत आहेत. प्रतिवादी क्र.०३ ने वडिलोपार्जीत मिळकत गट क्र.४७ मध्ये सर्वांची संमती नसतांना बेकायदेशिर विहीर खोदकाम सुरु केले आहे व जे.सी.बी. ने खड्डा केला आहे. वादींनी विरोध करुन हिस्से वाटणी झाल्यानंतर काम करा असे म्हटले असता प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांनी त्यांना शिवीगाळ करुन मारुन टाकण्याची धमकी दिली. त्याबाबत वादीने पोलीस स्टेशन घोटी येथे तक्रार नोंदविली. तेव्हा प्रतिवादींनी वादींना त्रास देणार नाही असे कबुल केले. परंतु त्यानंतरही प्रतिवादी वादींना त्रास देत असून मिळकती विक्री करण्याचा विचारात आहेत व तशा हालचाली सुरु केल्या आहे असे वादींना समजले आहे. वादींनी प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांना दिनांक ०६/०३/२०१९ रोजी वकिलांमार्फत नोटीस पाठवून वाटणीची मागणी केली. सदर नोटीस प्रतिवादींना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक २३/०३/२०१९ रोजी नोटीसला खोटे व लबाडीचे उत्तर दिले. दिनांक २९/०९/२०१९ रोजी प्रतिवादी क्र.०१ व ०६ मिळून दावा मिळकत गट क्र.७६ मध्ये

ट्रॅक्टर लावून लेव्हलिंग चे काम सुरु केले. वादींनी त्याला विरोध केला असता प्रतिवादींनी त्यांना मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे वादींनी पोलीस स्टेशन घोटी येथे तक्रार नोंदविली. दाव्याची सुनावणी होउन निकाल लागण्यास बराच कालावधी लागेल. दावा मिळकतीवर प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांचे नाव असल्याचा गैरफायदा घेउन त्या मिळकती विक्री केल्यास वादींचे कधीही भरुन येणार नाही असे नुकसान होईल. याउलट वादीची मागणीप्रमाणे मनाई हुकूम दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी केस वादीच्या हक्कात आहे. प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांनी दावा मिळकती कोणत्याही प्रकारे विक्री अथवा हस्तांतरण करु नये त्यात कोणतेही बदल, फेरबदल किंवा बांधकाम करु नये असा तुर्तातूर्त मनाई हुकूम देण्यात यावा अशी वादींनी विनंती केली.

**०३** प्रतिवादी क्र.०१ व ०३ यांनी निशाणी क्र.४३ अन्वये त्यांची कैफियत व मनाई हुकुमाच्या अर्जास जबाब दाखल केला आहे. त्यांनी वादींशी असलेले त्यांचे नातेसंबंध मान्य केले आहेत. प्रतिवादी क्र.०१ व ०३ यांच्या कथनाप्रमाणे सन १९८१-८२ च्या दरम्यान रघुनाथ भोसले यांनी त्यांच्या हयातीत दावा मिळकतींची तोंडी वाटणी ठरवली होती व काही मिळकतीचे वाटप करुन प्रतिवादी क्र.०१ व वादी क्र.०१ यांच्या नावे मिळकती केल्या. त्यांची नोंद फेरफार क्र.९२१ अन्वये घेण्यात आलेली असून त्यानंतर सन १९९१-९२ मध्ये प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांनी त्यांचे नावे असलेले मौजे धामणी येथील गट क्र.४७, १९१ व पिंपळगावमोर येथील गट क्र. १७४ मध्ये आपआपसांत तिघांच्या सोईने वादीच्या माहितीत व जाणीवेत पुनर्वाटप करुन घेतले होते. सन २००१ मध्ये रघुनाथ भोसले हे मयत झाल्यापासून सन १९८१-८२ मध्ये वाटप झाल्याप्रमाणे प्रत्येकजण त्यांच्या हिश्यात आलेल्या हिश्याप्रमाणे मिळकती वहिती करीत होते. प्रतिवादी क्र.०४ ते ०६ यांनी दावा मिळकतीतील त्यांच्या अधिकाराबाबतीत हक्कसोडपत्र करुन दिलेले आहे. सन २००६ पासून

प्रतिवादी क्र.०३ हे ठरल्याप्रमाणे वाटप करुन मिळकतीच्या महसुल दप्तरी हक्कपत्रात नोंदणी करण्याबाबत मागणी करीत आले होते व घरात झालेल्या बैठकीप्रमाणे इगतपुरी तहसिल कार्यालयात वाटपासाठी अर्जही दिला होता. परंतु वादी क्र.०२ यांनी त्यास हरकत घेतली. प्रतिवादी क्र.०३ यांनी दिनांक २७/१०/२०१२ रोजी वादी व इतर प्रतिवादींना नोटीस पाठवून पुर्वी झालेल्या वाटपाप्रमाणे नोंदी घ्याव्या व ठरल्याप्रमाणे वाटपपत्र करुन घ्यावे नाहीतर न्यायालयीन प्रकरण करावे लागेल असे कळविल्यावर वादींनी प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांना 'तुमच्या हिश्यात आलेल्या मिळकतींचे वाटप करुन घ्या आम्ही नंतर करतो' असे सांगितल्यावर प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांनी त्यांच्यात सन १९९०-९१ मध्ये ठरल्याप्रमाणे मिळकतींचे वाटपपत्र दिनांक २८/०३/२०१३ इगतपुरी दुयम निबंधक यांच्या कार्यालयात दस्त क्र. १०६०/२०१३ अन्वये नोंदविले आहे व त्याची फेरफार नोंद क्र.८६९ अन्वये घेण्यात आली. त्यापुर्वी सन २००३ मध्ये प्रतिवादी क्र.०४ ते ०६ यांनी नोंदणीकृत हक्कसोडपत्र करुन दिले असून त्याची नोंद क्र.४६३ अन्वये घेण्यात आली आहे. वादी व प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांनी त्यांच्या हिश्यात आलेल्या मिळकतींचा विकास व सुधारणा केलेल्या असून त्यांनी स्वतंत्रपणे बॅन्क व सोसायटीकडून कर्ज घेतले आहे. प्रतिवादी क्र.०१ यांचा मुलगा किरण यांच्या नावे खरेदी असलेल्या क्षेत्रातील आर.सी. सी. बांधकामाची पाण्याच्या टाकीचा मोबदला महसुल अधिकारी यांची दिशाभूल करुन वादींनी मिळविली असल्याने किरणने सरकारी कार्यालयात अर्ज केल्याने वादींनी चिडून प्रतिवादींना खोटी नोटीस पाठविली. त्यामुळे प्रतिवादींनी दिनांक २३/०३/२०१९ रोजी नोटीसीचे उत्तर दिलेले आहे. वादी हे स्वत: प्रतिवादींच्या हिश्यात आलेल्या जागेत बेकायदेशिरपणे बांधकाम करु पाहत आहेत. वादींनी खोटा दावा केलेला आहे. केवळ दावा मिळकतींना वादींची नावे असल्याचा गैरफायदा घेउन वाटप झालेले नाही असे खोटे सांगत आहेत. वादींना पुर्वी झालेले वाटप नाकारण्याचा नैतिक व कायदेशीर अधिकार नाही. त्यामुळे त्यांना दाव्यात केलेल्या मागण्या

मागण्याचा कोणताही अधिकार नाही त्यामुळे दावा रद्द होण्यास पात्र आहे. त्याचप्रमाणे दाव्यात आवश्यक पक्ष केलेले नसल्यामुळे तसेच इतर घर मिळकतींचा समावेश केला नसल्यामुळे दावा खारीज होण्यास पात्र आहे. तसेच दावा मुदतीत नसल्यामुळे तो खारीज होण्यास पात्र आहे अशी प्रतिवादी क्र.०१ व ०३ यांनी विनंती केली आहे.

**०४** प्रतिवादी क्र.०२ हे दिनांक ०७/०२/२०२० रोजी दाव्यात हजर झाले परंतु त्यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद दाखल केलेला नाही. त्यामुळे दावा त्यांच्या कैफियतीशिवाय व उत्तराशिवाय चालविण्यात यावा असा आदेश करण्यात आला.

**०५** दोन्ही पक्षाचे कथन, अभिलेखावरील दस्तऐवज तसेच दोन्ही बाजुंच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. त्यापुढे खालील दिलेल्या कारणमिमांसेवरुन पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१) | वादींची प्रथमदर्शनी केस आहे हे वादी सिध्द करतो काय? | होय. |
| ०२) | सोयीचे पारडे हे वादींच्या बाजुने आहे हे वादी सिध्द करतो काय? | होय. |
| ०३) | तात्पुरता मनाई हुकुम पारीत न केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होते काय? | होय. |
| ०४) | कोणता आदेश? | अंशत: मंजूर. |

## कारणमिमांसा

**०६** वादीतर्फे वकील श्री.आय.एस.परदेशी यांनी दाव्यातील कथनाप्रमाणे युक्तिवाद केला. त्यांनी युक्तिवाद केला की, सन १९८१-८२ मध्ये केवळ कौटुंबिक व्यवस्थेमध्ये दाव्यातील मालमत्ता ही वादी व प्रतिवादी यांच्या ताब्यात वहिती करुन उत्पन्न

घेण्याकरीता देण्यात आली. वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने कोणतेही वाटप तुटक झालेले नाही. प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांनी दावा मिळकतीपैकी काही मिळकती ह्या विक्री केल्या व त्यामध्ये तृतीय पक्ष हक्क प्रस्थापित केले आहेत. प्रतिवादींनी दावा मिळकतीवर बांधकाम सुरु केले आहे. दावा मिळकतीचे हिस्से वाटप झालेले नसल्यामुळे त्या क्षेत्रात वादी व इतर प्रतिवादी यांचे सुध्दा हक्क व हिस्से आहेत. प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांनी दावा मिळकतींवर त्यांच्या नावाचा गैरफायदा घेऊन दावा मिळकत पुढे सुध्दा विक्री करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांनी दावा मिळकतीवर बांधकाम केल्यास वादींचे अपरिमित नुकसान होईल त्यामुळे सकृतदर्शनी केस ही वादींच्या हक्कात आहे. तुर्तातूर्त मनाई हुकूम पारीत न केल्यास वादींचे अतोनात नुकसान होईल. याउलट प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे सोईचे पारडे हे वादींच्या हक्कात आहे. त्यामुळे वादींच्या हक्कात तुर्तातूर्त मनाई हुकूम पारीत करण्यात यावा अशी वादींतर्फे विनंती केली.

<u>०७</u> प्रतिवादी क्र.०१ व ०३ तर्फे वकील श्री.ओ.व्ही.भरींडवाल यांनी त्यांच्या उत्तराप्रमाणे युक्तिवाद केला. त्यांनी युक्तिवाद केला की, सन १९८१-८२ साली वादी क्र.०१ व प्रतिवादी क्र.०१ यांच्यामध्ये रघुनाथ भोसले यांनी हिस्सेवाटणी करुन दिलेली आहे. त्याचप्रमाणे वादी व प्रतिवादी क्र.०१ ते ०३ हे त्यांच्या हिश्यात आलेल्या मिळकतीच्या स्वतंत्र कब्जात असून वहिती करुन उत्पन्न घेत आहेत. वादींनी त्यांच्या हिश्यात आलेल्या मिळकतीमधून काही क्षेत्र समृध्दी महामार्गाकरीता शासनाने संपादीत केल्यामुळे त्याबाबतचा स्वतंत्र मोबदला स्विकारला आहे. वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये हिस्सेवाटणी झाली असल्यामुळे प्रतिवादींनी त्याबाबत कोणताही आक्षेप घेतलेला नाही. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये हिस्सेवाटणी झालेली नाही असा वादींना आक्षेप घेता येणार नाही. वादींनी घर मालमत्तेचा दाव्यात समावेश केलेला नाही

त्यामुळे सर्व मालमत्ता दाव्यात समावेश न केल्यामुळे दावा खारीज होण्यास पात्र आहे. वादींनी खरेदीखतांना आवाहन केलेले नाही. तसेच प्रतिवादी क्र.०१ च्या मुलाला प्रस्तुत दाव्यात पक्ष म्हणुन केलेले नाही. त्यामुळे सुध्दा सदरचा दावा हा खारीज होण्यास पात्र आहे. सन १९८१-८२ पासून वादी व प्रतिवादी त्यांच्या हिश्यात आलेल्या मालमत्तेच्या स्वतंत्र ताब्यात आहेत व त्याबाबत कोणताही आक्षेप घेतलेला नाही. त्यामुळे सदरचा दावा हा मुदतीत नाही. त्यामुळे सकृतदर्शनी केस ही वादींच्या हक्कात नाही. प्रतिवादींनी दावा मिळकतीवर कोणतेही बांधकाम केलेबाबत वादींनी मुळ दाव्यात कोणतीही आदेशात्मक हुकुमाची मागणी केलेली नाही. त्यामुळे त्यांना त्या संदर्भात कोणताही आदेश किंवा मागणी मागता येणार नाही. वादींनी त्यांचे प्रतिवादींसोबत दावा मिळकतीचे वाटप झाल्याची बाब व त्यांनी भुसंपादन केल्यास नुकसान भरपाई स्विकारल्याची बाब न्यायालयापासून लपवली आहे. त्यामुळे त्यांना कोणत्याही मनाई हुकुमाच्या आदेशाबाबत मागणी करता येणार नाही. त्यामुळे वादींचा अर्ज खारीज करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे. प्रतिवादींच्या विधिज्ञांनी खालील न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे.

या न्यायनिर्णयात माननीय न्यायालयाने खालीलप्रमाणे अवलोकन केलेले आहे.

***M/s. S.J.S. BUSINESS ENTERPRISES (P) LTD /s. STATE OF BIHAR AND OTHERS, 2004 STPL 5412 SC,*** Hon'ble Supreme Court of India observed that *"As a general rule, suppression of a material fact by a litigant disqualifies such litigant from obtaining any relief. This rule has been evolved out of the need of the Courts to deter a litigant from abusing the process of Court by deceiving it. But the suppressed fact must be a material one in the sense that had it not been suppressed it would have had an effect on the merits of the case"*

**०८** वादींच्या कथनाप्रमाणे दावा मिळकतींचे सरसनिरस मानाने कोणतेही

वाटप झालेले नाही केवळ कौटुंबिक व्यवस्था म्हणुन व दावा मिळकती त्यांच्या ताब्यात दिलेल्या आहेत. वादींनी त्यांच्या कथनाच्या समर्थनार्थ सातबारा उतारे, फेरफार नोंदी तसेच खाते उतारे दाखल केलेले आहेत. सदरच्या दस्तऐवजांचे अवलोकन केले असता नारायण लक्ष्मण भोसले हे मयत झाल्यानंतर त्यांचे वारस रघुनाथ नारायण यांच्या नावाची नोंद क्र.७२९ अन्वये घेण्यात आली. रघुनाथ नारायण भोसले हे दिनांक ०७/०१/२००१ रोजी मयत झाल्यामुळे त्यांचे वारस म्हणुन वादी व प्रतिवादी यांच्या नावाची नोंद क्र.४५१ दिनांक १७/०१/२००२ तसेच नोंद क्र.४८२ दिनांक ०३/०२/२००३ रोजी घेण्यात आली.

**<u>०९</u>** प्रतिवादी क्र.०१ पांडुरंग भोसले यांनी धामणी येथील गट क्र.३०९ पैकी ०.४० हे. आर जमीन तान्हाजी भोर यांना दिनांक ०४/१०/१९९९ रोजी कायमस्वरुपाने विकली असल्याबाबतची नोंद क्र.३९३ दिनांक २२/१०/१९९९ रोजी घेण्यात आली. तसेच त्यांनी जनाबाई भोसले यांना गट क्र.३०९ पैकी ४० आर शेतजमीन विक्री केल्याबाबतची नोंद क्र.७०४ दिनांक ०४/१०/२०१० रोजी घेण्यात आली. दावा मिळकती गट क्र.३५९, ३६४, ४७, ६, ७६, १७४ चा गाव नमुना ८-अ व सातबारा उता-याचे अवलोकन केले असता त्यात वादी तसेच प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांच्या नावाची नोंद दिसून येते. गट क्र.१९१, ३९५ च्या सातबारा उता-यावर वादी क्र.०१ व ०२ यांच्या नावाची नोंद दिसून येते. गट क्र.३०९/२ या जमिनीवर बबन ढेमसे यांच्या नावाची नोंद दिसून येते. वादी क्र.०२ यांनी प्रतिवादी क्र.०१ च्या मुलाविरुध्द पोलीस स्टेशन घोटी येथे दिनांक ११/१२/२०१८ रोजी दिलेली तक्रार दाखल केली आहे. त्याचप्रमाणे दिनांक ३०/०९/२०१९ रोजी पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीची प्रत दाखल केली आहे. त्यानंतर दिनांक ०६/०३/२०१९ रोजी प्रतिवादींनी दिलेल्या नोटीसची प्रत व प्रतिवादींना नोटीस मिळाल्याच्या तीन पोहोच पावत्या दाखल केल्या आहेत.

**१०** याउलट प्रतिवादी क्र.०१ व ०३ यांच्या कथनाप्रमाणे दावा मिळकतीची यापुर्वी हिस्सेवाटणी झालेली असून ते त्यांच्या हिश्यात आलेल्या मिळकतीच्या कब्जात आहेत. प्रतिवादी यांनी त्यांच्या कथनाचे समर्थनार्थ दावा मिळकत गट क्र.३६४ चा सातबारा उतारा दाखल केला आहे. सदर उता-यावरुन वादी तसेच प्रतिवादी क्र.०१ ते ०३ चे नाव दिसून येते.

**११** तसेच त्यांची रघुनाथ नारायण भोसले यांचा मुलगा प्रतिवादी पांडुरंग तर्फे अ.पा.क. आई देऊबाई व शिवाजी तर्फे अ.पा.क. आई सिताबाई यांच्यात जमिनीचे वाटप करुन दिल्याबाबतच्या तपशिलाची नोंद क्र.९२१ अन्वये घेतली असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे प्रतिवादी पांडुरंग भोसले यांनी रघुनाथ भोसले हे मयत झाल्यामुळे वादी व प्रतिवादी यांच्या नावाची नोंद घेणेबाबत अर्ज दिल्यामुळे गट क्र.६, ४७, ७६, ३५९, ३६४ या दावा मिळकतींवर नोंद क्र.४५१ अन्वये दिनांक १७/०१/२००२ रोजी नोंद घेण्यात आल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र.०४ ते ०६ यांनी वादी व प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांच्या हक्कात लिहून दिलेले हक्कसोड पत्राप्रमाणे दिनांक ०६/०५/२००३ रोजी नोंद क्र.४६३ अन्वये नोंद घेण्यात आल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांच्यात दस्त क्र.१०६०/२०१३ अन्वये आपआपसांत वाटणीपत्र करुन घेतल्याच्या तपशिलाची नोंद दिनांक १७/०४/२०१३ रोजी नोंद क्र.८६९ अन्वये घेण्यात आली असे दिसून येते. सदर नोंदीप्रमाणे गट क्र.५२, १२५ व ३०९ यातील क्षेत्र प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांच्यामध्ये वाटप करुन दिले असल्याचे दिसून येते.

**१२** प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांनी त्यांच्या वकिलांमार्फत वादींना दिनांक २३/०३/२०१९ रोजी पाठविलेली उत्तर नोटीस दाखल केली आहे. वादी क्र.०१ व ०२ तसेच प्रतिवादी क्र.०२ व ०३ यांनी प्रतिवादी क्र.०१ चा मुलगा किरण

भोसले यांच्या संमतीने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी गट क्र.३५९ च्या काही क्षेत्राचे खरेदीखत करुन दिल्याबाबत खरेदीखताची प्रत दाखल केली आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र.०१ चा मुलगा किरण याने वादी तसेच प्रतिवादी क्र.०२ व ०३ यांच्या संमतीने गट क्र.३५९ च्या काही क्षेत्राचे खरेदीखत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना लिहून दिल्याच्या खरेदीखताची प्रत दाखल केली आहे.

**१३** अभिलेखावरील दोन्ही पक्षाचे कथन तसेच दाखल पुराव्याचे अवलोकन केले असता दावा मिळकत ही नारायण लक्ष्मण भोसले यांच्या निधनानंतर त्यांचा मुलगा रघुनाथ नारायण भोसले यांच्या नावे करण्यात आली. रघुनाथ भोसले यांच्या निधनानंतर गट क्र.६, ४७, ७६, ३५९, ३६४ या मिळकतींवर प्रतिवादी क्र. ०१ यांच्या लेखी अर्जाद्वारे वादी व प्रतिवादी क्र.०१ ते ०६ यांचे नाव नोंदविण्यात आले. रघुनाथ हे मयत होण्यापुर्वी वादी क्र.०१ व प्रतिवादी क्र.०१ हे लहान असतांना त्यांच्या दरम्यान नोंद क्र.९२१ अन्वये रघुनाथ यांनी जमिनीचे वाटप करुन दिले व त्याप्रमाणे पांडुरंग यांच्या हिश्यात जुना सर्व्हे नं.७४/१, १२६, १७२, १७५ ह्या शेतजमिनी व शिवाजी यांच्या हिश्यात जुना सर्व्हे नं.१०९, ११०, १२७ ह्या शेतजमिनी देण्यात आल्याचे दिसून येते. वादींनी वादपत्रातील परिच्छेद क्र.०१ मध्ये दिलेल्या दावा मिळकतींचे विवरण बघितले असता वर नमूद केलेल्या मिळकतींव्यतिरिक्त सुध्दा इतर मिळकतींबाबत प्रस्तुतचा दावा दाखल केला असल्याचे दिसून येते. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे त्यांच्या विशेष कथनातील परिच्छेद क मध्ये दिल्याप्रमाणे वादी व प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांचेमध्ये दावा मिळकतींचे १९८१-८२ व १९९१-९२ मध्ये वाटणी झालेली आहे व त्याबाबतचा तपशिल त्यांनी दिलेला आहे. सदर तपशिलाचे अवलोकन केले असता गट क्र.१२५ ही वादींना समान क्षेत्र वाटप करुन दिलेले आहे. परंतु, प्रतिवादींनी दाखल केलेली नोंद क्र.८६९ चे अवलोकन केले असता गट क्र. ५२, १२५ व ३०९ हे प्रतिवादींमध्ये वाटप करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे गट

क्र.७६ ही प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांना प्रत्येकी २६.६ आर. देण्यात येउन उर्वरित क्षेत्र रघुनाथ भोसले यांच्या उदरनिर्वाहाकरीता ठेवण्यात आले होते असे तपशिलात नमूद केलेले आहे. परंतु, गट क्र.७६ च्या सातबारा उता-यावर त्याबाबतची नोंद नाही. तसेच रघुनाथ भोसले आता मयत झालेले आहेत. त्यामुळे त्या क्षेत्राचे वाटप होणे बाकी आहे. प्रतिवादींनी त्यांच्या कैफियतीत दाखल केलेल्या वाटणीच्या तपशिलाचे अवलोकन केले असता त्याप्रमाणे महसूल कार्यालयात अर्ज करुन त्याबाबत सातबारा उतारे नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत असे दिसून येते.

**१४**		दोन्ही पक्षाचे कथन व दाखल केलेल्या दस्तऐवजांवरुन प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांनी गट क्र.३०९ यापैकी काही क्षेत्र इतर व्यक्तींना विक्री केले असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे गट क्र.३५९ पैकी काही भाग महामार्गासाठी संपादीत केले असल्याचे दिसून येते. वादींनी सदर दाव्यात प्रतिवादींनी विक्री केलेल्या विक्री पत्रांना आव्हान केलेले नाही. त्यामुळे त्यांना सदरचे विक्रीपत्र मान्य आहे असे म्हणता येईल. त्याचप्रमाणे दोन्ही पक्षाच्या काही शेतजमिनी या महामार्गासाठी संपादीत झालेल्या असून त्याबाबत मिळालेल्या नुकसान भरपाईची रक्कम त्यांनी स्वत: प्राप्त केलेली आहे. त्यामुळे देखील त्याबाबत वादी किंवा प्रतिवादींना कोणतीही हरकत आहे असे दिसून येत नाही.

**१५**		प्रतिवादी क्र.०१ व ०३ यांच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.०३ यांनी सन २००६ मध्ये वादी व प्रतिवादी क्र.०१ व ०३ यांना नोटीस देऊन तहसिलदार यांच्यासमक्ष प्रकरण दाखल केले असे कथन केले आहे. वादींनी दिनांक ०६/११/२००६ रोजी तहसिलदार इगतपुरी यांना वाटप अर्ज क्र.१३/२००६ यास हरकत असल्याबाबत त्यांचे म्हणणे सादर केले. ते निशाणी क्र.५४ सोबत दाखल केलेले आहे. सदर अर्जात त्यांनी प्रतिवादी क्र.०३ यांनी कलम ८५ प्रमाणे वाटप करुन मिळण्यासाठी दाखल केलेल्या अर्जातील मागण्या ख-या नाही व त्या रद्द

करण्यात याव्या व सदरची बाब ही दिवाणी न्यायालयाच्या न्याय कक्षेतील असल्याने तो रद्द करण्यात यावा असे म्हणणे सादर केले आहे. तसेच त्यांच्यामध्ये कधीही वाटप झालेले नाही असे कथन केले असल्याचे दिसून येत. त्यामुळे वादींनी पुर्वीपासून त्यांच्यात हिस्सेवाटणी झाल्याचे अमान्य केले आहे असे दिसून येते. त्यानंतर सन २०१२ मध्ये परत प्रतिवादी क्र.०३ यांनी नोटीस पाठविली. ती नोटीस पाठवून वाटपपत्राचा दस्त नोंदवून घ्यावा किंवा तहसिलदार इगतपुरी यांच्याकडे वाटपाचे प्रकरण सादर करावे असे नोटीस दिली असल्याचे दिसून येते व त्यानंतर सन २०१३ मध्ये प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांच्यामध्ये गट क्र.५२, १२५ व ३०९ या शेतजमिनी वाटप झाल्या असल्याचे दिसून येते. वादींनी सदर वाटप नोंदीबाबत कोणतीही हरकत घेतली असल्याचे अभिलेखावरुन दिसून येत नाही. परंतु, सदरचे वाटप हे प्रतिवादींच्या लेखी बयाणातील दिलेल्या तपशिलाप्रमाणे दिसून येत नाही.

<u>१६</u> दिनांक ०८/०९/२०२० रोजीचे तहसिलदार यांना दिलेल्या पत्राचे अवलोकन केले असता किरण पांडुरंग भोसले यांनी त्यांच्या मालकीच्या पाण्याच्या टाकीचा मोबदला न मिळाल्याबाबत हरकत घेतली होती. त्या अनुषंगाने वादी क्र. ०१ यांना दिलेला विजेचा मोबदला वसूल करुन किरण भोसले यांना पाण्याच्या टाकीचे मुल्यांकन देण्यात येऊन खरेदीखत नोंदविण्याची कार्यवाही करण्यात यावी असे नमूद केलेले आहे. त्या अनुषंगाने वादी क्र.०१ यांचेकडून दिनांक ०८/०७/२०२० रोजी अतिरिक्त प्रदान केलेली रक्कम रु.११,६५,४७५/- वसूल केली असल्याचे नमूद केलेले आहे. सदर दस्तऐवजावरुन वादी यांच्याकडून अतिरिक्त प्रदान केलेली रक्कम शासनाने वसूल करुन ती प्रतिवादी क्र.०१ यांच्या मुलाला देण्यात आल्याचे दिसून येते. त्यामुळे वादींनी प्रस्तुतचा वाटपाचा दावा दाखल केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

<u>१७</u> प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे वादी व प्रतिवादी यांच्यामधे दावा मिळकतीचे

आपसी वाटप झाले असले तरी दावा मिळकतींच्या सातबारा उता-यांवर त्याप्रमाणे नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. अभिलेखावर दाखल सातबारा उता-याचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांच्यात २०१३ मध्ये झालेल्या आपसी वाटपाप्रमाणे त्यांच्या नावाची नोंद गट क्र.१०५, ३०९/१ व ५२ मध्ये घेण्यात आल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे गट क्र.१९१, २९५ यांमध्ये वादींच्या नावाची नोंद दिसून येते. त्याव्यतिरिक्त गट क्र.१७४, ७६, ६, ४७, ३६४, ३५९ यावर वादी व प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांच्या नावाची नोंद दिसून येते. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे दावा मिळकतींची पुर्वीच हिस्सेवाटप झाले असल्यास ते पुरावा देउन गुणवत्तेवर सिध्द करणे गरजेचे आहे. परंतु, अभिलेखावरील सातबारा उता-यांचे अवलोकन केले असता वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये सर्व दावा मिळकतींची हिस्सेवाटणी झाली असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. वादींनी प्रस्तुतचा दावा वाटपासाठी दाखल केला आहे. प्रतिवादींनी दावा मिळकती या वडिलोपार्जीत मालकीच्या असल्याचे नाकारलेले नाही. अशा परिस्थितीत दावा मिळकतीत वादी व प्रतिवादी यांचा हक्क व अधिकार आहे. प्रतिवादी क्र.०४ हिनेसुध्दा प्रस्तुत प्रकरणात हजर होऊन तिची लेखी कैफियत तसेच वाटपाकरीता उलट दावा दाखल केला आहे. त्यामुळे वादींच्या हक्कात प्रथमदर्शनी केस असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रथमदर्शनी केस ही वादींच्या बाजुने आहे.

<u>१८</u> वरील विवेचनावरुन वादातील मालमत्ता ही वादी व प्रतिवादी यांची वडिलोपार्जीत मालमत्ता असल्याचे दिसून येते. त्यामुळे वादींचा सदरच्या दावा मालमत्तेत हक्क व हिस्सा आहे. प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांच्या कथनाप्रमाणे त्यांच्या हक्कात आलेल्या गट क्र.३०९/१ व ३०९/२ मधील क्षेत्र त्यांनी विक्री केलेले आहेत. त्याचप्रमाणे गट क्र.३५९ मधील काही क्षेत्र प्रतिवादी क.०१ चा मुलगा किरण पांडुरंग भोसले यांच्या नावाने सुध्दा विक्री केलेला आहे. सदर गट क्रमांकाच्या सातबारा उता-यावर वादी, प्रतिवादी क्र.०१ त ०३ तसेच किरण भोसले यांचे नाव सुध्दा दिसून

येते. तसेच इतर दावा मिळकतींवर प्रतिवादी यांचे नाव आहे. दावा मिळकती या प्रतिवादींच्या लेखी जबाबातील दिलेल्या तपशिलाप्रमाणे वाटप झाल्या हे प्रतिवादींनी पुराव्यानिशी सिध्द करणे गरजेचे आहे. वादी व प्रतिवादी यांचे वाटपाबाबत वाद असून त्यांनी एकमेकांविरुध्द पोलिसांत तक्रारी दिल्याचे दिसून येते. वाद मालमत्तेच्या सातबारा उता-यावर प्रतिवादींचे नाव आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी वादातील मालमत्ता हस्तांतरीत करण्याची किंवा विल्हेवाट लावण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रतिवादींनी वादातील मालमत्ता विक्री केल्यास वादींचा हक्क डावलला जाईल. त्यामुळे वादींचे अतोनात नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे तात्पुरता मनाई हुकूम पारीत न केल्यास वादींचे अपरिमित नुकसान होईल व सोयीचे पारडे हे वादींच्या बाजुने आहे असे प्रथमदर्शनी दिसून येते.

**१९** वादींनी घर मिळकतींबाबत दाव्यामध्ये उल्लेख केलेला नाही किंवा त्याबाबत कोणतेही वाटप मागितलेले नाही. दोनही पक्षांचे कथन व पुराव्याचे अवलोकन केले असता वादी तसेच प्रतिवादी यांचे घरे असून ते ब-याच वर्षापासून तेथे राहत आहेत. प्रतिवादींनी दाखल केलेल्या दस्तऐवजावरुन घर क्र.१९३ हे घर १९९५ साली गट क्र.३६४ मध्ये त्यांच्या वडिलांनी बांधकाम केले असे प्रतिवादींनी कथन केले आहे. वादींनी सुध्दा गट क्र.३५९ मध्ये घराचे बांधकाम केलेले आहे असे प्रतिवादींचे कथन आहे. तसेच वादींचे ताब्यात असलेल्या घराचे काही क्षेत्र हे महामार्गाकरीता संपादीत करण्यात आले असे वादींचे कथन आहे. प्रतिवादींनी वादी राहत असलेल्या घराचे छायाचित्र प्रकरणात दाखल केलेले आहे. तसेच प्रतिवादी राहत असलेल्या घराचे छायाचित्र अभिलेखावर दाखल केले आहे. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे त्यांचे घर नादुरुस्त असल्याने व पडीत असल्याने त्यांनी ग्रामपंचायत धामणी यांच्याकडे माहे मे, २०२२ मध्ये अर्ज दिल्यावरुन ग्रामपंचायतीने त्यांना रितसर परवानगी दिलेली आहे. त्यामुळे त्यांनी निम्मे घर खोलून त्याचे बांधकाम

सुरु केले आहे. प्रतिवादींनी त्यांच्या कथनाच्या समर्थनार्थ घर क्र.१९३ चा गाव नमुना क्र.८ चा उतारा, कर भरल्याची पावती, विजेचे बिल इ. दाखल केले आहेत. तसेच बांधकाम परवानगीचा ना-हरकत दाखला व पंचनामा दाखल केला आहे. त्यामुळे प्रतिवादी हे ग्रामपंचायतीचे परवानगी घेऊन त्याप्रमाणे घराच्या दुरुस्तीचे काम करीत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच प्रतिवादींना घर बांधकाम करण्यास प्रतिबंध केल्यास त्यांचे साहीत्य वाय जाईल व त्यांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादींनी घराचे बांधकाम करु नये असा त्यांच्याविरुध्द मनाई हुकूम पारीत केल्यास प्रतिवादी यांचे नुकसान होईल. याउलट वादीसुध्दा दावा मिळकत क्र.३५९ मधील काही क्षेत्रात घर बांधून राहत आहेत. अशा परिस्थितीत प्रतिवादींविरुध्द त्यांनी घराचे बांधकाम करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम पारीत करणे योग्य होणार नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.०१ ते ०३ चे उत्तर उपरोक्तप्रमाणे नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.०४ करीता :-</u>**

<u>२०</u> एकंदरीत वरील विवेचनावरुन सकृतदर्शनी केस ही वादींच्या बाजुने आहे. तसेच तात्पुरता मनाई हुकूम पारीत न केल्यास वादींचे अपरिमित नुकसान होणार हे वादींनी सिध्द केले आहे. तसेच सोयीचे पारडे देखील वादींच्या बाजुने आहे. त्यामुळे वादींच्या हक्कात तात्पुरता मनाई हुकूम पारीत करणे योग्य होईल. दावा मिळकतीच्या सातबारा उता-यावर प्रतिवादींचे नाव असल्यामुळे दावा मिळकतीवर तृतीय पक्ष हक्क निर्माण करण्याची तसेच त्यावर बोझे निर्माण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. दावा मिळकती हस्तांतरीत केल्यास वादींचे अतोनात नुकसान होईल त्यामुळे त्या संदर्भात तात्पुरता मनाई हुकूम वादींच्या हक्कात पारीत करणे योग्य होईल. याउलट वादी हे स्वत: दावा मिळकतीतील काही क्षेत्रात घर बांधून राहत असून प्रतिवादींना त्यांच्या घराचे नादुरुस्त असल्याचे काम पूर्ण

करण्यास प्रतिबंध केल्यास प्रतिवादींचे नुकसान होईल. त्यामुळे त्या संदर्भात प्रतिवादींविरुध्द मनाई हुकूम पारीत करणे योग्य होणार नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत दाव्याचा अंतीम निकाल लागेपर्यंत प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांनी स्वत: किंवा इतरांमार्फत वादातील मालमत्ता कोणालाही हस्तांतरीत करु नये, विल्हेवाट लावू नये किंवा तृतीय पक्ष अधिकार प्रस्थापित करु नये, बोझा निर्माण करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम पारीत करण्यात येत आहे.

३. अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट करण्यात यावा.

MANJUSHA MANIKRAO ALONE

Digitally signed by MANJUSHA MANIKRAO ALONE
Date: 2022.12.27 15:15:46 +0530

ठिकाण - इगतपुरी
दिनांक - २२/१२/२०२२

(एम.एम.अलोणे)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर
इगतपुरी